वाचा :-

१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शाळांना परवानगी देण्याबाबत.

२) शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१८/प्रक्र.११३४/एसएम-२ मंत्रालय मुंबई ३२ दि.१८/९/२०१८ रोजीचे पत्र

३) मा. शिक्षण उपसंचालक मुंबई विभग, मुंबई यांचेकडील जाक्र.शिउसं/ माध्य-३/स्वअशा/प्र.क्र.९५/२०१८/ २३६५४ दि.२६/१०/२०१८ रोजीचे पत्र

४) शिक्षणाधिकारी ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडील ठामपा/ शिवि/जाक्र.१९२/२३ दि.२७/४/२०२३ रोजीचा प्रथम मान्यता मिळणेबाबत तपासणी अहवालासह प्रस्ताव.

---

**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**
**प्रथम मान्यता आदेश**

जाक्र.ठाजिप/शिक्षण/प्राथ/प्रास-२/ नर्सो-७१२०८/२३
शिक्षण विभाग प्राथमिक
जिल्हा परिषद ठाणे
दिनांक :-११/१०/२०२३

सेवेन इलेवन एज्युकेशन सोसायटी बी.पी.रोड. भाईंदर संचलित, सेवेन स्क्वेअर अॅकडमी, प्लॉट रोसा गार्डनच्या पुढे विहंग व्हेलीच्या समोर, ओवला, माजिवाडा, ठाणे जि.ठाणे या नवीन शाळेस प्राथमिक वर्गांना (इ.१ ली ते इ.५ वी ) सीबीएसई सलग्नता, इंग्रजी या माध्यमातून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात शासनाने विहीत केलेल्या खालील अटीच्या अधिन राहुन वरील शाळेस प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१. संस्था सदर शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.

२. आर.टी.ई. अॅक्ट २००९ नुसार भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.

३. शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादा व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या अथवा मंजूरी दिलेल्या दराने वेतन व भत्ते देणे बंधनकारक आहे.

४. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणा-या या आदेशाचे वर्गातील विदयार्थी संख्या, विदयार्थाचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

५. मुला-मुलींसाठी स्वंतत्र स्वच्छतागृहाची सोय व्हावी.

६. पालक शिक्षक संघ, माता पालक संघाची नियमाप्रमाणे स्थापना व कार्यवाही करावी.

७. फी चे दर शासनाच्या निर्णयानुसार निश्चित करावेत.

८. कर्मचारी नियुक्ती करतांना रोष्टरनुसार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणूका कराव्यात.

९. शाळेची इमारत व परिसर शिक्षणास अनुकूल व सुरक्षित असला पाहिजे.

१०. शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार वेतनश्रेण्या व सेवा शर्ती या अधिन राहुन कर्मचारी वर्ग नेमला पाहिजे.

११. सदर शाळांनी शासनाच्या / खात्यांच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे (उदा. विदयार्थीच्या प्रवेशाबाबत व अन्य बाबी) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

१२. मुख्याध्यापकांच्या नियुक्तींस संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता घेणे बंधनकारक राहील.

१३. सदर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील मान्यता मिळविलेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी पत्रव्यवहार करताना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा अशाप्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

१४. सर्व संबंधिताच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक आहे.

१५. शासन निर्णय दिनांक ०९/०२/२०१६ अन्वये अप्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करण्यात येऊ नये.

१६. शासन निर्णय दिनांक १४/०७/२०१७ अन्वये तीन वर्षात शाळा A ग्रेड मध्ये आणण्याच्या अधीन राहून सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१७. बालकांनचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

१८. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ दिनांक २१ मार्च, २०१४ व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ दिनांक १३ एप्रिल, २०१६ मधील अटी व शर्तीची कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक आहे.

१९. शाळेचे हिशेब व सर्व प्रकारच्या नोंदवहया अध्यावत ठेवणे बंधनकारक आहे.

२०. शासनाने विहीत केलेल्या आदेशान्वये सरल प्रणालि मधिल डाटा वेळोवेळी अदयावत करणे बंधनकारक राहील.

२१. विशेषत: अग्निरोधक संदर्भातील सुरक्षेबाबत योग्य ती कार्यवाही, विदयार्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व व्यवस्था व अग्निपासून कुठल्याही दुर्घटना होउ नये, याबाबत प्रतिबंधात्मक दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२२. शासन निर्णय दिनांक ०३/११/२००९ अन्वये शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जि.प च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याकडून शाळेची ईमारत नॅशनल बिल्डींग कोड प्रमाणे (NBC) असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२३. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनीयमन) अधीनियम २०१२ मधील कलम ४ (१) अंतर्गत तरतूदी नुसार अनुसूची ग मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावी लागेल व तशी रक्कम मुदत ठेवीत ठेवली असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२४. मुख्याध्यापक सेवेन इलेवन एज्युकेशन सोसायटी बी.पी.रोड. भाईंदर संचलित, सेवेन स्क्वेअर ॲकॅडमी, प्लॉट रोसा गार्डनच्या पुढे विहंग व्हेलीच्या समोर, ओवला, माजिवाडा, ठाणे जि.ठाणे यांनी त्यांच्या शाळेस प्रथम मान्यता मिळणेबाबत प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रके बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार उदभवल्यास अथवा खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रके आढळून आल्यास या र्यालयाकडुन देण्यात आलेली प्रथम मान्यता रद्द समजण्यात येईल.

**(डॉ. भाऊसाहेब कारेकर)**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
**जिल्हा परिषद ठाणे**

**प्रत** :- मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग,मुंबई यांना माहितीस्तव सादर.